महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित(महानिर्मिती : विनंती अर्जदार) आर्थिक वर्ष २०१०-११ चे समायोजन आणि आर्थिक वर्ष २०११-१२आणि १२-१३ वीजदर ठरवण्याबाबत याचीका

# कार्यकारी सारांश

# वर्ष २०१२ चे प्र.क्र.६

# कार्यकारी सारांश

महानिर्मिती कंपनीने (महाजेनको/याचीकाकर्ता) अपिलीय लवादाकडे, मा.अपिलीय लवादाच्या अपील क्र. १९९/२०१० संदर्भातील निवाडयावर पूनर्विलोकनार्थ याचीका दाखल केली आहे आणि मा. आयोगाच्या प्रकरण क्र .१६/२०११ आणि प्र.क्र. ८१/२०११ च्या आदेशाविरूध्द अपिल दाखल केले आहे. महानिर्मितीने हि याचीका कुठलाही पूर्वग्रह न ठेवता कंपनिचे, कायदेशीर कार्यवाही आणि कायदेशीर उपाययोजना करण्याचे हक्क अबाधीत ठेवुन सादर केली आहे.

मा. आयोगाने दि.४ फेब्रूवारी २०११ रोजी 'बहुवार्षिक वीजदर आधिनियम २०११' प्रसिध्द केले. 'बहुवार्षिक वीजदर आधिनियम २०११' नुसार बहुवार्षिक वीजदर राजवट दि. १ एप्रील २०११ पासुन आंमलात आली. महानिर्मिती कंपनीने 'बहुवार्षिक वीजदर आधिनियम २०११' च्या तत्वांनुसार बहुवार्षिक वीजदर ठरविण्यापासुन सुट मिळण्यासंबंधी याचीका (संदर्भ आर.सी.डी. २०११/६१/एल-२८२ दिनांक.३० मार्च २०११) दाखल केली. त्यानंतर महानिर्मितीने आं.व. २००९-१० चे समायोजन आ.व.(२०१०-११) वार्षिक कामगिरी आढावा आणि आ.व. २०११-१२ चे वीजदर ठरवीण्यासाठी (आयोग प्र.क्र ६८/२०११) याचीका सादर केली. महानिर्मितीला बहुवार्षिक विजदर ठरवण्यातुन सुट मिळण्याची याचीका त्यावेळी प्रलंबीत असल्यामुळे मा. आयोगाने असे आदेश दिले की महानिर्मितीने आ.व. २००९-१० चे अंतीम समायोजन आणि आ.व. २०१०-११ साठीचे तात्पूरते समायोजन यासाठी एक वेगळी याचीका सादर करावी. महानिर्मितीने आयोगाच्या आदेशानुसार तशी याचीका सादर केली. मा.आयोगाने ती याचीका प्र.क्र.१०७/२०११ खाली दाखल करूण घेतली व त्यावर कायदेशीर कार्यवाही केली. महानिर्मितीच्या सुट मिळण्यासंबंधी याचीके संदर्भात मा. आयोगाने निर्णय देऊन महानिर्मितीला बहुवार्षिक वीजदर ठरवण्यातून दोन वर्षाची सुट दिली आहे. नंतर मा. आयोगाने प्र.क्र.६८/२०११ संदर्भात दि.२१ सप्टेंबर २०११ च्या पत्रा द्वारे असे निर्देश दिले की, महानिर्मितीने आ.व.२०११-१२ साठी एकुण महसुलाची आवश्यकता व वीजदर निश्चीती साठी याचीका सादर करावी. त्यानंतर, मा.आयोगाने दि. ४ नोव्हें.२०११ च्या पत्रा द्वारे महानिर्मितीला असे आदेश दिले की, आ.व.२०११-१२ आणि २०१२-१३ साठी एकुण महसुलाची आवश्यकता व वीजदर निश्चीती करीता; वीजदर विनियम २००५ वर आधारित उशीरात उशीरा दि. ३० नोव्हेंबर २०११ पर्यंत याचीका सादर करावी. महानिर्मितीने प्रत्र क्र. आर.सी.डी २०११/६१/एल -११६२ दि.३० नोव्हेंबर २०११ द्वारा वरील याचीका आयोगाकडे दि. १० डिसेंबर २०११ पर्यंत सादर करण्यात येईल असे कळविले होते.

महानिर्मिती कंपनीने ही याचिका बांधिल दिनांकाला सादर केल्यानंतर दोन तांत्रिक सप्रमाणीकरण सत्राचे (टिव्हिएस)दि. १ फेब्रुवारी व २३ फेब्रुवारी २०१२ रोजी आयोजन झाले. महानिर्मिती कंपनीने, ही पुनरावलोकित याचिका तांत्रिक सप्रमाणीकरण सत्राचेवेळी मा.आयोगाने उपस्थित केलेले मुद्ये विचारात घेवुन सादर केली आहे. महानिर्मिती कंपनीने आयोगाच्या मंजुरीसाठी आ.व.२०१०-११ चे अंतीम समायोजन, आ.व.२०११-१२ ची एकुण महसुली आवश्यकता आणि आ.व. २०११-१२ व २०१२-१३ साठी वीजदर निश्चिती साठी सादर केलेली याचीका; वीजदर विनियम २००५ वर आधारित आणि बहुवार्षीक वीजदर विनियम २०११ अंमलात येण्यापुर्वीच्या तत्वांवर आधारीत आहे.

सदरची याचीका ही आ.व. २०१०-११ च्या अंकेक्षित लेखा, आ.व. २०११-१२ करीता पहील्या सहा महिन्यांचा प्रत्यक्ष खर्च (डिसेंबर २०११ पर्यत प्रत्यक्ष इंधन खर्च) व पुढील सहा महीन्यांचा अंदाजीत खर्च आणि आ.व. २०१२-१३ साठीचा प्रक्षेपीत खर्च यावर आधारीत आहे.

हया याचीकेची रचना दोन भागत केलेली आहे. भाग एक हा महानिर्मितीच्या जुन्या (विद्यमान)वीज केंद्रा विषयी आहे, तर भाग दोन हा नुकतेच सुरू झालेल्या पारस संच ३, ४ आणि परळी संच ६, ७ हया विषयी आहे.

महानिर्मितीने हया याचीकेत कोळशाच्या निकृष्ठ दर्जा विषयी विस्तृतपणे लिहिले आहे. या प्रस्तुतीमध्ये वीजकेंद्रांची कामगिरी ही ३.३५ मि. मेट्रिक टन विदेशी कोळश्याचा वापर गृहीत धरून केलेली आहे. धुतलेल्या कोळशाच्या पुरवठयाचा कराराची मुदत जुलै २०११ मध्ये संपली आहे आणि महाजनको, हया कराराच्या कंत्राटदाराबरोबर धुतलेल्या कोळशाचा पुरवठा आणि गुणवत्ता विषयी उद्‌भवलेले मुद्‌दे विचारात घेवुन नुतनीकरणा बाबतचे पर्याय पारखत आहे.

मा.आयोगाने प्रमाणकानुसार कामगिरी आणि इंधन खर्च मान्य करते वेळी कोळशाच्या गुणवत्तेचा मुद्दा आणि वीजकेंद्राच्या कामगिरीवर त्याचे होणारे परिणाम हे विचारात/जाणुन घेतलेले नाहीत. हीच बाब गतकाळात महानिर्मितीला खर्चात झालेल्या मोठया नामंजुरीसाठी कारणीभुत ठरली; ती इतकी की महानिर्मितीला होणारा तोटा कमी करण्यासाठी काही जुने संच २०१०-११ आणि २०११-१२ मध्ये बंद करावे लागले.

हया याचीकेद्वारे महानिर्मिती आयोगाला अशी विनंती करत आहे की, प्रमाणकानुसार कामगिरीस मंजुरी देतांना ती वास्तवावर आधारीत असावी. मा.आयोगाने ही वास्तविकता विचारात न घेतल्यास महानिर्मितीला एक तर आनखी काही जुने संच बंद करावे लागतील किंवा लक्षणिय किंमतीचा विदेशी कोळसा आयात करावा लागेल. महानिर्मितीने सादर केलेल्या विकल्पामधे आयात कोळसा व देशी कोळसा यांचे मिश्रण अभिकल्पक उष्मांक (डिझाईन सी व्ही) देईल असे आहे. अशा स्थितीत ग्राहकांवर सुमारे रू २५०० कोटींचा अतिरिक्त बोजा पडु शकतो.

महानिर्मिती असे मानते की प्रचलीत प्रमाणकानुसारी राजवट ही फक्त भ्रामक कार्यक्षमतेला प्रोहोत्सान देते, ज्यामध्ये फक्त मानकी घटकांची पुर्तता यावरच लक्ष केंद्रीत केले जाते. आणि त्याचवेळेस वीज निर्मितीची अंतीम परिणामकारकता अर्थात वीजेची किंमत विसरली जात आहे. जर ही राजवट अशीच चालु राहीली तर, एक पर्याय म्हणून आयात कोळशाचा आधीक वापर महानिर्मितीला करावा लागेल ज्यामुळे सुमारे रू.२५०० कोटीचा अतिरिक्त बोजा ग्राहाकांवर पडेल. महानिर्मिती मा. आयोगाला अशी विनंती करते की वास्तवीक पातळीच्या प्रमाणकानुसारी प्रचलांना मान्यता द्यावी अथवा अशा आयात कोळशाचा अतिरीक्त वापर करण्यास तत्वता मान्यता द्यावी जेणेकरून अभिकल्पक उष्मांक (डिझाईन सी व्ही) मिळविता येईल. हे जर विचाराधीन झाले नाही तर महानिर्मितीला तोटा कमी करण्यासाठी काही संच बंद करण्याशिवाय पर्याय राहणार नाही.

**भाग- एक (महानिर्मितीची जुनी वीज केंद्रे)**

(अ) आर्थिक वर्ष २०१०-११ साठीचे समायोजन

विद्युत अधिनियम २००३, कलम १३१ (५)(जी) याअन्वये दिनांक ६ जुन २००५ रोजी अधिसुचित करण्यात आलेल्या तात्पुरत्या हस्तांतरण योजनेस अद्याप अंतिम रूप देण्यात आलेले नाही, या वस्तुस्थितीकडे आयोगाचे लक्ष वेधण्यात येत आहे. सदर योजनेस अंतिम रूप देणे प्रलंबित असल्याकारणाने हस्तांतरित मालमत्तेचे मुल्य, विद्युत अधिनियम २००३ चे कलम १३१(२) च्या पहिल्या परंतुकानुसार संभाव्य महसुलावर आधारित ठरणाऱ्या मालमत्तेच्या मुल्यात बदल होऊ शकतो. अशा प्रसंगी आवश्यक त्या समायोजनाच्या मान्यतेसाठी महानिर्मिती माननिय आयोगा कडे विनंती करेल. खर्च बाजु समायोजनाचा गोषवारा खालील तक्त्यात याचकाने दिला आहे.

तक्ता : आर्थिक वर्ष २०१०-११ चा समायोजनाचा सारांश

रू.कोटीमध्ये

| **तपशिल** | **आयोगाने मान्य केलेली (अ)** | **लेखांकीत प्रत्यक्ष खर्च/वीजदर प्रमाणका प्रमाणे आ.व.२०१०-११ (ब)** | **समायोजित रक्कम(ट्रुयुअप) (अ-ब)** |
|---|---|---|---|
| **खर्चबाजू समायोजन** | | | |
| वीज निर्मिती खर्च | ८,१७०.०० | ७,१८२.६५ | ९८७.३५ |
| इंधन खर्च | ७,९००.२६ | ६,९५०.५० | ९४९.७६ |
| इतर अस्थिर आकार | २६९.७४ | २३२.१५ | ३७.५९ |
| भाडेपटटी आकार | ३१४.८१ | ३०९.२७ | ५.५४ |
| संचालन व सुव्यवस्था विषयक खर्च | १,१४३.६४ | १,४१४.४५ | (२७०.८१) |
| घसारा व त्यासाठीच्या अग्रिमासहीत | २०२.८९ | ३४१.६० | (१३८.७१) |
| दीर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज आणि वित्त भार | १२७.९४ | ७२.०५ | ५५.८९ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | ३५२.८७ | ३२३.६७ | २९.२० |
| खेळत्याभांडवलावरील व्याजाच्या फायदयाची १/३ विभागणी | | | १८.५५ |
| आयकर | ७०.३६ | १७१.४५ | (१०१.०९) |
| भाग भांडवलावरील परतावा | ३५८.८८ | ३५१.३६ | ७.५२ |
| इतर खर्च | ० | १९.०८ | (१९.०८) |
| पुर्वकालीन खर्च | | २४.०७ | (२४.०७) |
| **एकूण रक्कम** | १०,७४१.३९ | १०,२०९.६६ | ५५०.२८ |
| **उत्पन्नाच्या बाजूचे समायोजन** | | | |
| वीज विक्री उत्पन्न (प्रोत्साहन रक्कम सोडून) | ११२८९.२६ | ९७९२.१५ | (१४९७.११) |
| वीज विक्री सोडून उत्पन्न | ९७.१७ | ७७.९५ | (१९.२२) |
| **मान्य केलेले एकूण उत्पन्न** | ११३८६.४३ | ९८७०.१० | (१५१६.३३) |
| **निव्वळ समायोजित रक्कम** | | | (९६६.०५) |
| **आ.व.२००८-०९ आणि २००९-१० साठी घाटघर जलविद्युतचे** संचालन व सुव्यवस्था विषयक खर्चाचे समायोजन | ० | १.१६ | (१.१६) |
| **समायोजित रक्कम** | | | (९६७.२१) |

तसेच, महानिर्मितीने आ.व. २०१०-११ च्या उत्पन्नाच्या बाजूच्या समायोजनाचा विचार करून एकंदरीत समायोजनासाठी रू.९६७.२१ कोटी मागणी केली आहे.

**(ब) आ.व. २०११-१२ आणि आ.व. २०१२-१३ करीता एकूण महसुलाची आवश्यकता**

**आ.व. २०११-१२ आणि आ.व. २०१२-१३ करीता महानिर्मितीच्या सध्याच्या वीजकेंद्रांची एकत्रीत महसुलाच्या गरजेचे प्रक्षेपण खालील तक्त्यात दिले आहे.**

तक्ता: महानिर्मितीच्या वीज केंद्राची एकत्रीत वार्षिक महसूलाची आवश्यकता

रू. कोटीमध्ये

| **तपशिल** | प्रत्यक्ष आ.व २०१०-११ | आ.व.२०१०-११ मान्य केलेला | आ.वर्ष २०११-१२ चा अंदाजित खर्च | आर्थिक वर्ष २०१२-१३ **प्रक्षेपण** |
|---|---|---|---|---|
| **अस्थिर आकार** | | | | |
| इंधनसंबंधीत खर्च | ६,९५०.५० | ७९००.२६ | ८२६६.६८ | ९३२९.९० |
| इतर इंधनासंबंधीचा खर्च | २३२.१५ | २६९.७४ | २१७.७० | २२६.४० |
| **एकूण अस्थिर आकार** | **७,१८२.६५** | **८,१७०.००** | **८४८४.३८** | **९५५६.३०** |
| **स्थिर आकार** | | | | |
| संचालन व सुव्यवस्था विषयक खर्च | १,४१४.४५ | ११४३.६४ | १४५३.७५ | १५७३.२२ |
| दीर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज आणि वित्तीय खर्च | ७२.०५ | १२७.९४ | १०१.३० | १८४.९७ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | ३२३.६७ | ३५२.८७ | ४१५.१५ | ४६२.३१ |
| घसारा, व त्यासाठीच्या अग्रिमासहीत | ३४१.६० | २०२.८९ | २८९.१६ | ३१७.३२ |
| भाग भांडवलावरील परतावा | ३५१.३६ | ३५८.८८ | ३४६.०५ | ३४५.४१ |
| जलभाडेपटटी आकार | ३०९.२७ | ३१४.८१ | ३२८.४५ | ३२८.८९ |
| आयकर | १७१.४५ | ७०.३६ | ६९.२४ | ६९.१२ |
| इतर खर्च | ४३.१६ | ०.०० | ३५.४७ | ०.०० |
| (-) वजा वीज विक्री व्यतिरिक्त मिळणारे उत्पन्न | ७७.९५ | ९७.१७ | ११५.८४ | १२०.११ |
| **एकूण स्थिर आकार** | २,९४९.०७ | २,४७४.२२ | २९२२.७४ | ३१६१.१४ |
| **एकूण महसुलाची गरज** | **१०,१३१.७२** | **१०,६४४.२२** | **११४०७.११** | **१२७१७.४४** |

टिप: हया तक्त्यातील सर्व घटक हे ए आर आर प्रारूपाप्रमाणे आहे. हया तक्त्यात परळी ६ व ७ आणि पारस ३ व ४ संच तपशिल समाविष्ट नाही.

**क) प्रती युनीट वीजदर**

**अस्थिर आकार :**

महानिर्मितीच्या सध्याच्या वीजकेंद्रांचे आ.वर्ष २०११-१२ आणि आ.व. २०१२-१३ करीता प्रस्तावीत प्रति-युनिट-वीजदर खालील तक्त्यात दिले आहेत.

महानिर्मिती वीजकेंद्राचा **अस्थिर आकार (रू./कि. वॉ. तास)**

| ठिकाण | २०११-१२ | २०१२-१३ |
|---|---|---|
| | अंदाज | प्रक्षेपित |
| भुसावळ | ३.३२ | ३.४५ |
| चंद्रपूर | २.०७ | २.११ |
| नाशिक | ३.७२ | ४.०६ |
| कोराडी | २.८६ | ३.११ |
| परळी | ३.०५ | २.८९ |
| उरण | २.१० | २.१२ |
| खापरखेडा | २.२८ | २.५० |

**एकूण आकार**

**केंद्रनिहाय प्रती युनिट एकूण आकार खालील तक्त्यामध्ये दिला आहे.**

| वीजकेंद्र | २०१०-११ | | | २०११-१२ | | | २०१२-१३ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | निव्वळ वीज निर्मिती | अे.आर.आर. | आकार | निव्वळ वीज निर्मिती | अे.आर.आर. | आकार | निव्वळ वीज निर्मिती | अे.आर.आर. | आकार |
| | द.ल.युनिट | रू.कोटी | रू.प्रति युनिट | द.ल.युनिट | रू.कोटी | रू.प्रति युनिट | द.ल.युनिट | रू.कोटी | रू.प्रति युनिट |
| भुसावळ | २१५७.१८ | ७८९.२० | ३.६६ | २०९०.७७ | ९१२.२८ | ४.३६ | २३६२.९३ | १०७५.०३ | ४.५५ |
| चंद्रपूर | ९७४५.४० | २५७४.८७ | २.६४ | १२३५९.६९ | ३३६२.२२ | २.७२ | १३९५१.७२ | ३८४२.६७ | २.७५ |
| नाशिक | ४४९८.१२ | १६६२.६८ | ३.७० | ३७९३.४३ | १६८०.३१ | ४.४३ | ३६५०.६९ | १७७४.७६ | ४.८६ |
| कोराडी | ३१०९.७३ | १०१५.६५ | ३.२७ | ३०३६.६७ | ११५६.११ | ३.८१ | ३४६३.८६ | १३८४.९९ | ४.०० |

| वीजकेंद्र | २०१०-११ | | | २०११-१२ | | | २०१२-१३ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | निव्वळ वीज निर्मिती | अे.आर.आर. | आकार | निव्वळ वीज निर्मिती | अे.आर.आर. | आकार | निव्वळ वीज निर्मिती | अे.आर.आर. | आकार |
| | द.ल.युनिट | रू.कोटी | रू.प्रति युनिट | द.ल.युनिट | रू.कोटी | रू.प्रति युनिट | द.ल.युनिट | रू.कोटी | रू.प्रति युनिट |
| परळी | २९७५.७२ | १०६२.७२ | ३.५७ | २४८९.०१ | १००२.०७ | ४.०३ | ३५२३.७३ | १२८६.५९ | ३.६५ |
| पारस | ४७.५६ | ३८.०७ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| उरण | ५३३५.७६ | १११०.६९ | २.०८ | ४६७५.५४ | ११५०.२६ | २.४६ | ४६८४.८३ | ११६३.१४ | २.४८ |
| खापरखेडा | ५१५७.७२ | १४३६.९४ | २.७९ | ५३२६.९३ | १६८२.३३ | ३.१६ | ४९०८.८६ | १७१३.४६ | ३.४९ |
| जल | ४६०४.७६ | ४४०.९० | ०.९६ | ४२६७.५९ | ४६१.५२ | १.०८ | ३८३४.९१ | ४७६.८० | १.२४ |
| **एकूण** | **३७६३१.१६** | **१०१३१.७२** | **२.६९** | **३८०३९.६३** | **११४०७.११** | **३.००** | **४०३८१.५३** | **१२७१७.४४** | **३.१५** |

**तक्ता :**महानिर्मिती **वीज केंद्रांचा एकूण खर्च**

| *२०१०-११साठी लेखापरिक्षित (रु कोटी)* | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **स्थिर आकार** | **भुसावळ** | **चंद्रपूर** | **नाशिक** | **कोराडी** | **परळी** | **पारस** | **उरण** | **खापरखेडा** | **जल** | **एकूण** |
| संचलन व सुव्यवस्था विषयक खर्च | १३१.४७ | ३९०.३५ | २२४.८५ | २११.१७ | १३२.५७ | १०.४४ | ५२.२४ | १५६.७५ | १०४.६२ | १,४१४.४५ |
| दिर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज | २.४२ | २०.०३ | ९.०४ | ९.३० | ६.५० | ०.१९ | ९.८३ | ४.४५ | ३.८२ | ६५.५८ |
| वित्त आकार | ०.५२ | ०.९२ | ०.४७ | ०.९२ | ०.७६ | ०.०२ | १.९६ | ०.६६ | ०.२३ | ६.४७ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | २५.२४ | ८३.६४ | ५२.८२ | ३२.८१ | ३४.१२ | १.०९ | ३६.८९ | ४६.१४ | १०.९३ | ३२३.६७ |
| घसारा | १०.०१ | ११९.८३ | २३.५० | २६.८५ | २७.७३ | ०.३९ | १९.१५ | ८३.८५ | ६.८५ | ३१८.१७ |
| घसारासाठीच्या अग्रिमसहित | | | | २१.०९ | | | १.३९ | | ०.९६ | २३.४३ |
| भाग भांडवलावरील परतावा | १३.३२ | १०७.५८ | २७.७३ | १७.९६ | १८.८२ | ०.३५ | ३९.४८ | १२६.११ | | ३५१.३६ |
| आयकर | ६.५० | ५२.५० | १३.५३ | ८.७६ | ९.१८ | ०.१७ | १९.२७ | ६१.५४ | | १७१.४५ |
| जलविद्युत केंदासाठी भाडेपटटी | | | | | | | | | ३०९.२७ | ३०९.२७ |
| रजा रोखीकरण | २.३५ | ११.६० | ४.३६ | ५.१७ | ३.३३ | ०.२७ | ४.२२ | ४.१६ | | ३५.४७ |
| पुर्वकालीन खर्च | १.७५ | (१२.७२) | (२.७१) | (१०.८३) | ८.४४ | ०.२२ | (२.७२) | २.९० | ४.२८ | (११.४०) |
| इतर खर्च | ६.८८ | ०.७६ | ३.७३ | १.३९ | ०.४० | ७.७३ | (१.००) | (०.९३) | ०.१३ | १९.०८ |

| *२०१०-११साठी लेखापरिक्षित (रु कोटी)* | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्थिर आकार | भुसावळ | चंद्रपूर | नाशिक | कोराडी | परळी | पारस | उरण | खापरखेडा | जल | एकूण |
| वजा वीजविक्री सोडुन उत्पन्न | ५.०३ | १८.८२ | ११.७१ | ११.९९ | १४.८४ | ०.०६ | १.८३ | १२.७२ | ०.९४ | ७७.९५ |
| **एकूण स्थिर आकार** | **१९५.४३** | **७५५.६७** | **३४५.६२** | **३१२.५८** | **२२७.०२** | **२०.८१** | **१७८.८८** | **४७२.९२** | **४४०.१५** | **२९४९.०७** |
| **अस्थिर आकार** | | | | | | | | | | |
| कोळशाची किंमत | ५१२.१८ | १६२४.०३ | १११७.९६ | ५८५.९८ | ७१६.६२ | १३.९३ | ९३०.८४ | ९२०.५२ | | ६४२२.०७ |
| तेल किंमत | ५९.४८ | १४४.९१ | १३१.०८ | ९०.०२ | ७६.०९ | ०.७९ | | २६.०५ | | ५२८.४३ |
| **इंधन किंमत** | **५७१.६६** | **१७६८.९४** | **१,२४९.०५** | **६७६.००** | **७९२.७१** | **१४.७२** | **९३०.८४** | **९४६.५८** | | **६,९५०.५०** |
| इतर अस्थिर दर | २२.११ | ५०.२६ | ६८.०१ | २७.०६ | ४२.९९ | २.५४ | ०.९७ | १७.४५ | ०.७५ | २३२.१५ |
| **एकूण अस्थिर दर** | **५९३.७७** | **१८१९.२०** | **१,३१७.०६** | **७०३.०७** | **८३५.७०** | **१७.२६** | **९३१.८१** | **९६४.०३** | **०.७५** | **७,१८२.६५** |
| **एकूण महसूलाची आवश्यकता** | **७८९.२०** | **२,५७४.८७** | **१,६६२.६८** | **१,०१५.६५** | **१,०६२.७२** | **३८.०७** | **१,११०.६९** | **१,४३६.९४** | **४४०.९०** | **१०१३१.७२** |

***महानिर्मितीच्या वीजकेंद्रनिहाय आ.व. २०११-१२ आणि २०१२-१३ च्या एकुण खर्च खालील तक्त्यात दिला आहे.***

**तक्ता :महानिर्मिती वीज केंद्रनिहाय एकूण खर्च**

| **२०११-१२ अंदाजीत खर्च ( रु कोटी)** | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **स्थिर आकार** | **भुसावळ** | **चंद्रपूर** | **नाशिक** | **कोराडी** | **परळी** | **उरण** | **खापरखेडा** | **जल** | **एकूण** |
| संचालन व सुव्यवस्था विषयक खर्च | १४५.९६ | ४३०.०१ | १७८.२३ | २०४.०४ | १५५.७२ | ६०.९४ | १६९.९९ | १०८.८७ | १,४५३.७५ |
| दिर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज | ११.२९ | २९.०९ | १७.२६ | ८.५८ | १०.७३ | ८.०७ | ७.४६ | ३.७२ | ९६.२१ |
| वित्त आकार | ०.५१ | ०.९८ | ०.३६ | ०.४८ | ०.६४ | १.५६ | ०.३६ | ०.१९ | ५.०९ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | ३३.०२ | १२३.७० | ६१.४७ | ४२.२७ | ३६.५६ | ४३.५० | ६१.६७ | १२.९६ | ४१५.१५ |
| घसारा | १४.४५ | १०१.५० | २३.१८ | ६.०४ | २८.६५ | ७.५१ | ८५.१८ | ६.५१ | २७३.०० |
| घसाऱ्यासाठीचा अग्रिम | - | - | - | १५.४९ | - | - | - | ०.६७ | १६.१६ |
| भाग भांडवलावरील परतावा | १३.१५ | १०७.५८ | २५.८२ | १५.७६ | १८.५६ | ३९.०७ | १२६.११ | - | ३४६.०५ |
| आयकर | २.६३ | २१.५३ | ५.१७ | ३.१५ | ३.७१ | ७.८२ | २५.२४ | - | ६९.२४ |
| जल विद्युत केंद्रासाठी भाडेपटटी | - | - | - | - | - | - | - | ३२८.४५ | ३२८.४५ |

| २०११-१२ अंदाजीत खर्च ( रु कोटी) | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **स्थिर आकार** | भुसावळ | चंद्रपूर | नाशिक | कोराडी | परळी | उरण | खापरखेडा | जल | एकूण |
| रजा रोखीकरन | २.४२ | १३.४९ | ३.६३ | ३.५७ | ३.६३ | ३.८७ | ४.८४ | - | ३५.४७ |
| पुर्वकालीन खर्च | | | | | | | | | |
| इतर खर्च | | | | | | | | | |
| वजा(-) इतर उत्पन्न | ५.२५ | २०.०४ | ४५.७३ | १२.३४ | १६.१७ | २.२८ | १३.३८ | ०.६३ | ११५.८४ |
| **एकूण स्थिर आकार** | **२१८.१७** | **८०७.८५** | **२६९.३८** | **२८७.०४** | **२४२.०३** | **१७०.०५** | **४६७.४७** | **४६०.७४** | **२९२२.७४** |
| | | | | | | | | | |
| **वीजदर अस्थिर आकार** | | | | | | | | | |
| **कोळशाची किंमत** | ६२९.५० | २३८५.२३ | १२८३.६४ | ७६४.४४ | ५८७.०३ | ९७९.२९ | ११३४.७५ | - | ७७६३.८८ |
| तेल किंमत | ४०.९२ | १०७.१४ | ९४.४८ | ७१.३८ | १२८.३१ | | ६०.५८ | - | ५०२.८१ |
| इंधन किंमत | **६७०.४२** | **२४९२.३७** | **१३७८.१२** | **८३५.८२** | **७१५.३३** | **९७९.२९** | **११९५.३३** | **-** | **८२६६.६८** |
| इतर अस्थिर आकार | २३.६८ | ६२.०१ | ३२.८१ | ३३.२४ | ४४.७१ | ०.९२ | १९.५३ | ०.७८ | २१७.७० |
| **एकूण अस्थिर दर** | **६९४.११** | **२५५४.३८** | **१४१०.९४** | **८६९.०७** | **७६०.०५** | **९८०.२१** | **१२१४.८६** | **०.७८** | **८४८४.३८** |
| | | | | | | | | | |
| **एकूण महसूलाची आवश्यकता** | **९१२.२८** | **३३६२.२२** | **१६८०.३१** | **११५६.११** | **१००२.०७** | **११५०.२६** | **१६८२.३३** | **४६१.५२** | **११४०७.११** |

**तक्ता :महानिर्मिती वीज केंद्रनिहाय एकूण खर्च**

| *२०१२-१३ प्रक्षेपित खर्च ( रु कोटी)* | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्थिर आकार | भुसावळ | चंद्रपूर | नाशिक | कोराडी | परळी | उरण | खापरखेडा | जल | एकूण |
| संचालन व सुव्यवस्था विषयक खर्च | १५६.६९ | ४६४.४५ | १९२.१२ | २२०.३८ | १६७.९८ | ६२.८२ | १८३.६१ | १२२.१७ | १,५७३.२२ |
| दिर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज | ३३.३५ | ५३.१८ | २७.५८ | १८.८१ | १७.६५ | ८.२८ | १६.७३ | ४.९५ | १८०.५२ |
| वित्त आकार | ०.५० | ०.९६ | ०.३२ | ०.३५ | ०.५५ | १.२८ | ०.३४ | ०.१६ | ४.४५ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | ३८.७७ | १४०.८८ | ६४.८० | ५०.६८ | ४६.९० | ४४.०० | ६२.७७ | १३.५० | ४६२.३१ |
| घसारा | १९.२३ | १२८.८५ | २६.२७ | १०.२४ | ३०.३४ | ८.२३ | ८७.१८ | ६.८८ | ३१७.२३ |

| *२०१२-१३ प्रक्षेपित खर्च ( रु कोटी)* | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **स्थिर आकार** | **भुसावळ** | **चंद्रपूर** | **नाशिक** | **कोराडी** | **परळी** | **उरण** | **खापरखेडा** | **जल** | **एकूण** |
| घसाऱ्यासाठीचा अग्रिम | | | | | | | | ०.१० | ०.१० |
| भाग भांडवलावरील परतावा | १३.१५ | १०७.५८ | २५.१८ | १५.७६ | १८.५६ | ३९.०७ | १२६.११ | - | ३४५.४१ |
| आयकर | २.६३ | २१.५३ | ५.०४ | ३.१४ | ३.७१ | ७.८२ | २५.२४ | - | ६९.१२ |
| जलविद्युत केंद्रासाठी भाडेपटटी | | | | | | | | ३२८.८९ | ३२८.८९ |
| रजा रोखीकरण | - | - | - | - | - | - | - | - | - |
| पुर्वकालीन खर्च | - | - | - | - | - | - | - | - | - |
| इतर खर्च | - | - | - | - | - | - | - | - | - |
| वजा(-) इतर उत्पन्न | ५.४३ | २०.७० | ४७.५२ | १२.८० | १६.७८ | २.३३ | १३.८७ | ०.६६ | १२०.११ |
| **एकूण स्थिर आकार** | **२५८.८८** | **८९६.७३** | **२९३.७९** | **३०६.५७** | **२६८.९२** | **१७२.१७** | **४८८.०९** | **४७५.९९** | **३,१६१.१४** |
| | | | | | | | | | |
| **वीजदर अस्थिर आकार** | | | | | | | | | |
| **कोळशाची किंमत** | ७६०.२७ | २,७५६.८४ | १,३८८.९१ | ९७७.५० | ९३६.६२ | ९९०.०२ | १,१६२.३६ | - | ८,९७२.५२ |
| तेल किंमत | ३१.२५ | १२४.६१ | ५७.९३ | ६६.३४ | ३४.५५ | | ४२.७० | - | ३५७.३८ |
| इंधन किंमत | **७९१.५२** | **२,८८१.४५** | **१,४४६.८४** | **१,०४३.८४** | **९७१.१७** | **९९०.०२** | **१,२०५.०५** | **-** | **९,३२९.९०** |
| इतर अस्थिर आकार | २४.६३ | ६४.४९ | ३४.१३ | ३४.५७ | ४६.५० | ०.९५ | २०.३१ | ०.८१ | २२६.४० |
| **एकूण अस्थिर दर** | **८१६.१५** | **२,९४५.९४** | **१,४८०.९७** | **१,०७८.४२** | **१,०१७.६७** | **९९०.९७** | **१,२२५.३६** | **०.८१** | **९,५५६.३०** |
| | | | | | | | | | |
| **एकूण महसूलाची आवश्यकता** | **१,०७५.०३** | **३,८४२.६७** | **१,७७४.७६** | **१,३८४.९९** | **१,२८६.५९** | **१,१६३.१४** | **१,७१३.४६** | **४७६.८०** | **१२,७१७.४४** |

भाग दुसरा (पारस संच ३ व ४ परळी संच ६ व ७)

महानिर्मितीने याचीकेच्या दुसऱ्या भागात पारस संच ३ व ४, परळी संच ६ व ७ करीता आ.व. २०११-१२ आणि २०१२-१३ साठी एकुण महसुलाची आवश्यकता आणि विजदर ठरावण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.

पारस संच ३ आणि परळी संच ६ शी संबंधीत महानिर्मितीने बहुवार्षीक विजदराच्या दोन्ही आदेशावर दाद मागितली होती. अपीलय लवादाने (अेटीएने) दि. २७ एप्रील २०११ रोजी परळी संच ६ (अपील क्र.७२/२०१०) संदर्भात आणि दि. २४ मे. २०११ ला पारस संच ३ (अपील.क्र.९९/२०१०) संदर्भात आपला निवाडा दिला.

हया निवाडयानुसार (अपील.क्र. ७२/२०१० अपील क्र.९९/२०१०) ठरावीक वेळेपेक्षा जास्त वेळ लागल्यामुळे येणाऱ्या खर्चाचा आघात हा महानिर्मिती व ग्राहकांनी ५०:५० टक्के सोसावा. मा.आयोगाने हया नीवाडयाची अंमलबजावणी केली आहे. परंतु सनदी लेखापालाच्या दाखल्या प्रमाणे सुधारीत भांडवली कींमत मा. आयोगाने विचारात घेणे बाकी आहे.

तथापी, दिनांक ०१ फेब्रुवारी २०१२ रोजी तांत्रिक सप्रमाणीकरण सत्रात (टीव्हीएस) झालेल्या चर्चेनंतर महानिर्मितीने, अपीलीय लवादाच्या (अपील न. ७२/२१० व ९९/२०१०) निर्णयानुसार आयोगाने मान्य केलेला भांडवली खर्च समावीष्ट केला आहे. महानिर्मितीने बहुवर्षीय वीजदर याचीकेत सादर केलेली भांडवली किंमत त्या समक्ष सनदी लेखापालाच्या दाखल्याप्रमाणे दाखल केलेल्या भांडवली किंमतीतील बदल या संदर्भात असे सादर केले की परळी संच ६ संबंधी कामाची किंमत रूपये कोटी १०९९.०१ आणि वरकड खर्च हा रूपये १५९. ५५ नमुद केला होता तर प्रामाणित कामाची किंमत (माननिय आयोगाने मान्य केलेल्या सुटया भागांच्या किमती सहीत) ही रूपये १०१७.१७ कोटी व त्या बरोबर वरकड खर्च हा रूपये १०८. ४७ कोटी आहे. अशासाठी माननिय आयोगाने कामाची किंमत पुर्णपणे मान्य केली असल्यामुळे रूपये ४५.७४ कोटी निव्वळ भांडवली किंमत मान्यते साठी विचारात घेणे आवश्यक आहे. हया प्रीत्यर्थ भांडवली किंमतीची एकंदर समायोजित रक्कम याचीकेत सादर केली आहे. पारस संच क्र. ३ साठी, मा. अपिलीय लवादाच्या निरीक्षणावर आधारित मा. आयोगाने स्विकृत केलेल्या तत्वांनुसार ठरवण्यात येणाऱ्या भांडवली किंमतीत प्रामाणित भांडवली किंमतीमुळे फारसा फरक पडत नाही म्हणून महानिर्मिती प्रामाणित किंमती बद्दल आग्रही नाही.
तथापी मा. आयोगाला अशी विनंती करण्यात येते की, सनदी लेखापालाच्या दाखल्याप्रमाणे पारस संच क्र.३ जागेची किंमत रूपये १०.४१ कोटी विचारातघ्यावी.

पारस वार्षीक संच ४ आणि परळी संच ७ च्यासंबंधी महानिर्मितीने सादर केलेली महसुलाची गरज ही प्र.क्र.६९/२०११ यात आयोगाने मान्य केलेल्या भांडवली किंमतीवर आधारीत आहे.

आर्थिक वर्ष २०१०-११ साठी नवीन संचांचा समायोजित गोषवारा खालील तक्त्यात दिला आहे. (पारस संच ३ व ४ आणि परळी संच ६ व ७)

तक्ता : परळी संच ६ - साठी आर्थिक वर्ष २०१०-११ समायोजन रुपये कोटी

| **तपशील** | **आयोगाने मान्य केलेली** | **प्रत्यक्ष** | **समायोजित** |
|---|---|---|---|
| इंधन खर्च | २८९.८६ | ३३१.४४ | -४१.५८ |
| संचालन व सुव्यवस्था विषयक खर्च | ३८.५३ | ३८.८३ | -०.३० |
| घसारा | १०३.६७ | ९८.५६ | ५.११ |
| दिर्घकालिन कर्जावरील व्याज आणि वित्त भार | ८१.८९ | ७९.८२ | २.०७ |
| व्याजाच्या तोटयाचे १/३ विभागणी | | | -२.१६ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | १६.३७ | १९.२२ | -२.८५ |
| आयकर | ११.६७ | | ११.६७ |
| भाग भांडवलावरील परतावा | ५८.५४ | ६६.१८ | -७.६४ |
| **एकूण खर्च** | ६००.५३ | ६३४.०४ | -३५.६७ |
| **तपशील** | **आयोगाने मान्य केलेली** | **प्रत्यक्ष** | **समायोजित** |
| महसुल | ८२०.९३ | ६६८.७६ | -१५२.१७ |
| सनदी लेखापालाच्या दाखल्यात प्रमाणे कींमत नुतनीकरणा मुळे पुर्वकालीन समायोजन | ०.०० | ३९.४१ | -३९.४१ |
| **निव्वळ समायोजित रक्कम** | | | -२२७.२५ |

तक्ता : पारस संच ३ - साठी आर्थिक वर्ष २०१०-११ समायोजन रुपये कोटी

| **तपशील** | **आयोगाने मान्य केलेली** | **प्रत्यक्ष खर्च** | **समायोजित** |
|---|---|---|---|
| इंधन खर्च | २९१.६४ | २६९.०२ | २२.६ |
| संचालन व सुव्यवस्था विषयक खर्च | ३८.५३ | ३८.८३ | -०.३० |
| घसारा | ९५.७५ | ९५.७५ | ०.०० |
| दिर्घकालिन कर्जावरील व्याज आणि वित्त भार | ८३.४० | ८३.२३ | ०.१७ |
| व्याजाच्या तोटयाचे १/३ विभागणी | | | -२.६० |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | १६.५५ | १७.२९ | -०.७४ |
| आयकर | ११.८९ | | ११.८९ |
| भाग भांडवलावरील परतावा | ५९.६६ | ५९.९४ | -०.२८ |
| **एकूण खर्च** | ५९७.४२ | ५६४.०५ | ३०.८२ |
| **तपशील** | **आयोगाने मान्य केलेली** | **प्रत्यक्ष खर्च** | **समायोजित** |
| **महसुल** | ८००.८७ | ६४५.५० | -१५५.३७ |
| **निव्वळ समायोजित रक्कम** | | | -१२४.५६ |

तक्ता : परळी संच ७ – साठी आर्थिक वर्ष २०१०-११ समायोजन रुपये कोटी

| तपशील | आयोगाने मान्य केलेली | प्रत्यक्ष खर्च | समायोजित |
|---|---|---|---|
| इंधन खर्च | १५३.३५ | १९९.५० | -४६.१५ |
| संचालन व सुव्यवस्था विषयक खर्च | २५.६८ | २५.८८ | -०.२० |
| घसारा | ३०.४० | ३०.४१ | -०.०१ |
| दिर्घकालिन कर्जावरील व्याज आणि वित्त भार | ६१.९८ | ५८.७६ | ३.२२ |
| व्याजाच्या तोटयाचे १/३ विभागणी | | | -३.४८ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | ९.८७ | ११.१८ | -१.३१ |
| आयकर | ६.७९ | | ६.७९ |
| भाग भांडवलावरील परतावा | ३४.०८ | ३४.०८ | ०.०० |
| **एकूण खर्च** | **३२२.१५** | **३५९.८१** | **-४१.१४** |
| वीज विक्री उत्पन्न | ३२२.१५ | ३१२.३७ | -९.७८ |
| वीज विक्रीचे उत्पन्न सोडुन | ०.०० | ०.५३ | ०.५३ |
| **एकुण महसुल** | ३२२.१५ | ३१२.९० | -९.२५ |
| **निव्वळ समायोजित रक्कम** | | | -५०.३९ |

तक्ता : पारस संच ४ – साठी आर्थिक वर्ष २०१०-११ समायोजन रुपये कोटी

| तपशील | आयोगाने मान्य केलेली | प्रत्यक्ष खर्च | समायोजित |
|---|---|---|---|
| इंधन खर्च | १४२.८५ | १६६.५५ | -२३.७० |
| संचालन व सुव्यवस्था विषयक खर्च | २२.४७ | २२.६२ | -०.१८ |
| घसारा | २७.३३ | २७.३९ | -०.०६ |
| दिर्घकालिन कर्जावरील व्याज आणि वित्त भार | ६२.७९ | ५८.७४ | ४.०५ |
| व्याजाच्या तोटयाचे १/३ विभागणी | | | -३.८० |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | ९.१४ | ९.६१ | -०.४७ |
| आयकर | ४.७५ | | ४.७५ |
| भाग भांडवलावरील परतावा | २३.८२ | २३.८२ | ००.०० |
| **एकूण खर्च** | **२९३.१५** | **३०८.७६** | **-१९.४१** |
| वीज विक्री उत्पन्न | २९३.१५ | २८६.२४ | -६.९१ |
| वीज विक्रीचे उत्पन्न सोडुन | | २.४१ | २.४१ |
| एकुण महसुल | २९३.१५ | २८८.६५ | -४.५० |
| **निव्वळ समायोजित रक्कम** | | | -२३.९१ |

**वरील ४ संचांकरीता आ.व. २०११-१२ व आ.व. २०१२-१३ च्या एकुण महसुलाची आवश्यकता ही खालील तक्त्यात दिली आहे.**

| तपशील | पारस संच -३ | | पारस संच -४ | | परळी संच -६ | | परळी संच -७ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०११-१२ | २०१२-१३ | २०११-१२ | २०१२-१३ | २०११-१२ | २०१२-१३ | २०११-१२ | २०१२-१३ |
| इंधन खर्च | २६१.९२ | २८१.६६ | २७९.३४ | २८०.३० | ३०७.४४ | ३५०.०५ | २८३.६६ | ३४४.५४ |
| संचालन व सुव्यवस्था विषयक खर्च | ४१.९३ | ४५.२९ | ४१.९३ | ४५.२९ | ४१.९३ | ४५.२९ | ४१.९३ | ४५.२९ |
| घसारा व त्यावरील अग्रीमासहित | १०१.७८ | १०१.७८ | ७७.३९ | ७७.३९ | ९८.५६ | ९८.५६ | ६७.३४ | ६७.३४ |
| दिर्घकालिन कर्जावरील व्याज आणि वित्त भार | ७१.७५ | ६०.६२ | १३९.७७ | १३१.०८ | ७२.५८ | ७१.५१ | १००.३० | ९२.६४ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | १९.६९ | २०.२८ | २०.६९ | २१.०० | २१३८ | २३.१० | १९.७९ | २२.०८ |
| आयकर | १२.०४ | १२.०४ | ८.१७ | ८.१७ | १३.८२ | १३.८२ | १०.२३ | १०.२३ |
| एकुण मिळकती खर्च | ५०९.१२ | ५२१.६८ | ५६७.२९ | ५६३.२४ | ५५५.७१ | ६०२.३४ | ५२३.२६ | ५८२.१३ |
| भाग भांडवलावरील परतावा | ६०.१६ | ६०.१६ | ४०.८३ | ४०.८३ | ६९.०७ | ६९.०७ | ५१.१२ | ५१.१२ |
| वीज विक्री सोडून उत्पन्न | २.५१ | २.६१ | २.३९ | २.४८ | ३.७९ | ३.९४ | ०.८८ | ०.९२ |
| वर्षीक महसूलाची आवश्यकता | ५६६.७८ | ५७९.२३ | ६०५.७४ | ६०१.५९ | ६२०.९८ | ६६७.४६ | ५७३.५० | ६३२.३३ |
| परळी संच ६ सनदी लेखा पालाच्या नवीन दाखल्या प्रमाणे वाढीवएकूण महसूलाची आवश्यकता | | | | | ७.८१ | ७.४१ | | |
| एकूण वार्षीक महसूलाची आवश्यकता | ५६६.७८ | ५७९.२३ | ६०५.७४ | ६०१.५९ | ६२८.७९ | ६७४.८७ | ५७३.५० | ६३२.३३ |

**प्रति युनीट वीजदर**

**अस्थिर आकार**

आ.व. २०११-१२ आणि २०१२-१३ नवीन संचां करीता मागीतलेला अस्थिर आकार खालील तक्त्यात दिला आहे.

**तक्ता- आर्थिक वर्ष २०११-१२ व २०१२-१३ साठी अस्थिर खर्च (रूपये /युनीट)**

| **केंद्र** | **२०११-१२** | **२०१२-१३** |
|---|---|---|
| | **अंदाजीत** | **अंदाजीत** |
| **पारस संच ३** | **२.११** | **१.८१** |
| **पारस संच ४** | **२.१३** | **१.८०** |
| **परळी संच ६** | **२.७३** | **२.२६** |
| **परळी संच ७** | **२.७९** | **२.२२** |

**एकूण आकार**

प्रति युनिट एकुण आकार खालील तक्त्यात दिला आहे.

तक्ता- आर्थिक वर्ष २०११-१२ आणि २०१२-१३ साठी एकूण आकार (रूपये/युनीट)

| केंद्र | २०१०-११ | | | २०११-१२ | | | २०१२-१३ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | निव्वळ वीज निर्मिती | अे.आर. आर. | किंमत | निव्वळ वीज निर्मिती | अे.आर. आर. | किंमत | निव्वळ वीज निर्मिती | अे.आर. आर. | किंमत |
| | द.ल. युनिट | कोटी | रू. /युनिट | द.ल. युनिट | कोटी | रू. /युनिट | द.ल.युनिट | कोटी | रू. /युनिट |
| पारस संच ३ | १३०८.७९ | ५६१.६४ | ४.२९ | १२३९.५६ | ५६६.७८ | ४.५७ | १५५४.४६ | ५७९.२३ | ३.७३ |
| पारस संच ४ | ७६१.३२ | ३०६.३५ | ४.०२ | १३१०.५१ | ६०५.७४ | ४.६२ | १५५४.४६ | ६०१.५९ | ३.८७ |
| परळी संच ६ | १४४५.२९ | ६३०.३९ | ४.३६ | ११२४.२९ | ६२८.७९ | ५.५९ | १५४५.९२ | ६७४.८७ | ४.३७ |
| परळी संच ७ | ७७८.०३. | ३५९.२८ | ४.६२ | १०१७.६३ | ५७३.५० | ५.६४ | १५५०.१६ | ६३२.३३ | ४.०८ |

**प्रार्थना**

माननिय आयोगाला सविनय विनंती आहे की,

अ) ही याचीका उशीरा सादर करीत असल्यामुळे क्षमापीत असावी

ब) हा विनंतीअर्ज स्विकृत करावा.

क) अर्जाची जलद सुनावणी व्हावी.

ड) महानिर्मितीची अस्थिर वित्तिय स्थिती पाहता आ.व. २०१०-११ चे समायोजनाच्या बदल्यात, ३१ मार्च २०१२ च्या अगोदर अंतरीम सहाय्य मान्य करावे.

इ) हया याचीकेत महानिर्मितीने तर्कसंगत दावा केलेल्या आणि सादर केलेल्या आ.व. २०१०-११ चे अंतीम समायोजन व आ.व. २०११-१२ आणि २०१२-१३ ची एकुण महसुलाची गरज आणि वीजदर निश्चीती मान्य करावी.

फ) महानिर्मितीच्या हया याचीकेतएस एल डी सी च्या आदेशा प्रमाणे वीजकेंद्रांतुन वीजनिर्मिती कमी करण्याच्या प्रित्यर्थ जी मागणी केली आहे तीला, इंधन खर्च मान्य करतांना मान्यता द्यावी.

ग) महानिर्मितीला सध्याचा वीजदर आणि हया याचीकेद्वारे मान्यता मिळणारा अंतीम वीजदर यातील फरकाची रक्कम हया आदेशाच्या तारखेला वसुल करण्याची अनुमती द्यावी.

ह) हया याचीकेत सादर केलेल्या आगामी नवीन वीज संचांचा तात्पुरता वीजदर मान्य करावा.

ई) विनंती अर्जातील त्रुटी क्षमापित कराव्यात आणि नंतरच्या टप्प्यात आवश्यकतेप्रमाणे अतिरिक्त माहिती/सामग्री सादर करण्यास महानिर्मितीला परवानगी दयावी.

ज) माननिय आयोगाने वीजदर ठरविताना वापरलेले कार्यशील एक्सेल नमुना द्यावा ही विनंती.

ख) या याचीकेत विस्तृत केलेले कोळशाविषयीचे विविध मुद्दे लक्षात घेऊन महानिर्मितीसाठी व्यवहार्य तांत्रीक कामगिरीला (सी.पी.आर.आय. च्या अहवालातील या विषयीच्या परिणामा आधारे) मान्यता द्यावी.